


# महिला डॉक्टरांच्या नेतृत्वातून समाज परिवर्तनाची नांदी; रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्सतर्फे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित

डोंबिवली प्रतिनिधी : वैद्यकीय क्षेत्रात अहोरात्र रुग्णसेवा बजावणाऱ्या महिला डॉक्टरांनी केवळ उपचारांपुरते मर्यादित न राहता प्रशासकीय व सामाजिक नेतृत्वामध्येही पुढे यावे, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ डोंबिवली डायमंड्सच्या 'परिवर्तन वर्ष २०२६-२७' अंतर्गत एका विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. Women Doctors as Leaders - Healing Hands, Leading Minds" या संकल्पनेवर आधारित हे सत्र १५ जुलै रोजी पार पडले. ओम हॉस्पिटलच्या मेडिकल डायरेक्टर तथा प्रकल्प अध्यक्ष डॉ. वंदना शरद धाकटोदे यांच्या कुशल नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील विविध विभागांतील महिला तज्ज्ञांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. या मार्गदर्शन सत्रात प्रामुख्याने स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र, बालरोग, नेत्ररोग, शल्यचिकित्सा, भूलशास्त्र आणि अतिदक्षता विभागातील तज्ज्ञ महिला डॉक्टरांचा सहभाग होता. रुग्णसेवेची धुरा सांभाळताना उद्भवणारे ताणतणाव, त्वरित आणि अचूक निर्णय घेण्याची क्षमता, सांघिक व्यवस्थापन तसेच संवादकौशल्य या महत्त्वाच्या मुद्द्यांवर या वेळी सखोल मंथन करण्यात आले. वैद्यकीय कौशल्यांसोबतच नेतृत्वाची धार अधिक तीव्र करून महिला डॉक्टरांनी रोटरीसारख्या आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात आपले योगदान वाढवावे, असा संदेश या प्रसंगी देण्यात आला. सक्षम महिलाच सशक्त आणि प्रगतीशील समाजाची उभारणी करू शकतात, या विचारावर भर देत महिला सक्षमीकरणाचा हा उपक्रम समाजावर दीर्घकालीन सकारात्मक परिणाम करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटेरियन कुंदन नेमाडे, सचिव रोटेरियन जगदीश तांबट आणि प्रकल्प अध्यक्ष रोटेरियन डॉ. वंदना शरद धाकटोदे यांच्या विशेष प्रयत्नांतून हे सत्र यशस्वीरीत्या संपन्न झाले. महिला डॉक्टरांच्या या उपक्रमाचे डोंबिवलीतील वैद्यकीय व सामाजिक वर्तुळातून विशेष कौतुक केले जात आहे.

